REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें २.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ | पुणें, बुधवार, तारीख १८ मे, १९३८ | अंक २०

३रा आठवडा! ३रा आठवडा!

फक्त बारा वर्षांच्या मुलांमुलींकरितां
नाविन्यपूर्व चढाओढ!
प्रवेश फी नाहीं! विशेष अटी नाहींत!
५० रु. चा सुंदर हार्मोनियम बक्षिस!
"ध्रुव" बोलपटांतील नारदमुनींनीं गायिलेली
" प्रभुराज आज हंसला "
ही भैरवींतील गोड चीज जो मुलगा अगर मुलगी
हुबेहुब म्हणून दाखवील त्यास सुंदर हार्मोनियम बक्षिस!
☞ विशेष माहिती स्थानिक वर्तमानपत्रांत अगर
" ग्लोब " मध्यें चौकशी करा!

घरोघर
" ध्रुवा "चे प्रयोग चालू आहेत
वरील हार्मोनियम मिळविण्याच्या चढाओढींत भाग
घेणाऱ्या बालकांनीं 'ग्लोब'मध्यें नांवें नोंदवावींत!

वेस्टर्न इंडिया थिएटर्स लि. च्या खास व्यवस्थेखालील
रे-मार्केटजवळ, पुणें. ] ग्लोब टॉकीज [ टे. फो. नं. ६९१

३ रा आठवडा!
शनिवार ता. १४ मेपासून सुरू!
दररोज २ खेळ:-६॥ व १० वाजतां
शनिवार व रविवार नेहमींप्रमाणें
जादा खेळ दुपारीं ३॥ वाजतां

प्रभा पिक्चर मराठी बोलपट!
चिमुकल्या नटनटींचा बोलपट
ध्रुव
—भूमिका—
चिमखडा
बालकराम.

उत्कृष्ट रेडिओ, ग्रामोफोन रेकॉर्डस व रिपेअरचें एकच ठिकाण
अपॉलो म्युझिक हाऊस मेन स्ट्रीट, पुणें.

The Home for
Reliable STENO-TYPIST & ACCOUNTANTS
MARATHI KENDRA : 292 Sadashiv Peth POONA

'यश आलेंच पाहिजे.
मग महाराष्ट्रीय कसले ?'
अशा स्वाभिमानी महाराष्ट्रीयांच्या आर्थिक
साहाय्यानें सर्व मशिनरी आली, उभारणीला
सुरुवात झाली, ५०० एकर उंसाची
लागवड करतां आली.
तारीख १० जानेवारी १९३९च्या
मकर-संक्रमणाला
बृहन्महाराष्ट्रीय साखर
व
१२५० एकर उंसाची नवी लागवड
यशाला मदत व दरसाल ५॥ टक्के व्याज व दोन
वर्षांनीं रक्कम परत. डिपॉझिट रकमा घेण्यास
बोर्डानें मंजूरी दिली आहे.
रा. ब. काकासाहेब सहस्रबुद्धे, डॉक्टर रा. ह. भडकमकर M.A., M.D.
रा. ब. वि. क. मुळ्ये इंदोर, रा. ब. रावजी जनार्दन भिडे यांच्या
अभिप्रायांसह सविस्तर माहिती खालील पत्त्यावर मिळेल.
दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें.
२५७ बुधवार पेठ, पुणें २, बेलबागेसमोर.

६ टक्के मासिक आंवक ठेव
डॉन ऑफ इंडियाच्या वरील योजनेप्रमाणें तारीख
१-१०-३८चे आंत ठेव ठेवून फायदा मिळवा.
जनरल म्यानेजर-डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

# विविध माहिती

### ट्रेझरी बिलांवर १ रु. ६ आ. ४ पै व्याज

हिंदी रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत १ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा दर सरासरीनें द. सा. द. शे. १ रु. ६ आ. ४ पै पडला.

### आंतरराष्ट्रीय मजूरसंघाचें अधिवेशन

आंतरराष्ट्रीय मजूर संघाच्या २४ व्या अधिवेशनास जिनीव्हा येथें २ जून, १९३८ रोजीं प्रारंभ होणार आहे. सर फिरोजखान नून व सर फँक नॉइस ह्यांची हिंदुस्थान सरकारतर्फे प्रतिनिधी म्हणून नेमणूक जाहीर झाली आहे.

### साखरेच्या वहातुकीचे दरांत उतार

कानपुराहून उजैनेला साखर पाठविण्यास आतांपर्यंत दर मणास १ रुपया पडत असे. जी. आय. पी. रेल्वेनें हा दर जून अखेर पर्यंत प्रयोगादाखल उतरवून १२ आणे केला आहे.

### सॅकरीनच्या खपावर नियंत्रण

साखरेच्याऐवजीं सॅकरीन वापरणें आरोग्याच्या दृष्टीनें हानिकारक आहे; ह्याकरितां सॅकरीनच्या खपावर नियंत्रण घालावें म्हणजे साखरेच्या धंद्यासहि सहाय होईल, अशी सूचना संयुक्त प्रांत व बिहार शुगर कंट्रोल बोर्डानें प्रांतिक सरकारांस केली आहे.

### टारिफ बोर्ड

हिंदी रेशमाच्या धंद्याचे संरक्षणाबाबत टारिफ बोर्डाची चौकशी चालू आहे. मि. फाझल इब्राहिम रहिमतुल्ला हे बोर्डाचे अध्यक्ष असून मि. रौटन व मि. अंक्लेसारिया हे त्याचे सभासद आहेत.

### क्षयरोग निवारण फंड

१९३५ सालीं हिंदुस्थानांत एकूण ६५½ लक्ष लोक मरण पावले, त्यांपैकीं सुमारें ५ लक्ष क्षयरोगाचे बळी होते. दरसाल सुमारें ५० लक्ष लोक ह्या रोगानें पछाडलेले आढळतात. व्हाइसरायांच्या पत्नी, लेडी लिनलिथगो, ह्यांनीं क्षयरोग निवारणासाठी फंड जमविण्याचे प्रयत्न चालविले आहेत.

### वाईट हवेमुळें बुडणाऱ्या क्रिकेटचा विमा

पावसाळी हवेंत क्रिकेटचा सामना नीट होऊं शकत नाहीं. ह्या आपत्तीचा विमा उतरविण्याचा एम्. सी. सी. ह्या सुप्रसिद्ध क्रिकेट क्लबाचा रिवाज आहे. गेल्या वर्षी क्लबला वरील प्रकारच्या विम्याचे क्लेमपासून सुमारें ९ हजार रुपये मिळाले.

### सवलतीचा दर व रेल्वेची जबाबदारी

सवलतीच्या दरानें आगगाडींतून प्रवास करणारांस अपघात झाल्यास त्यांस ब्रिटिश रेल्वेज आजवर नुकसानभरपाई देत नसत. सवलतीच्या दराचीं परतीचीं तिकिटें अत्यंत लोकप्रिय होऊन त्यांचा फायदा लोक सर्रास घेऊं लागले तरीहि रेल्वेजची ही अट कायमच राहिली, ती आतां नुकतीच काढून टाकण्यांत आली आहे.

### शस्त्रक्रियेंत लोहचुंबकाचा उपयोग

कित्येक जनावरें दरसाल खिळे, तारा इत्यादि भक्षण केल्यामुळें मृत्युमुखीं पडतात. अमेरिकेंतील एका पशुवैद्यानें ह्यावर इलाज काढला आहे. पोटाचा छेद घेऊन आंत लोहचुंबक सोडला म्हणजे धातूंचे तुकडे व कण त्यास येऊन चिकटतात व अशा रीतीनें पोटांतील खिळे, इत्यादि बाहेर काढतां येतात. अनेक जनावरांचा जीव ह्या युक्तीनें वांचूं शकतो.

### सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्स

१९३८ च्या नवीन विमा कायद्यानें निर्माण केलेल्या 'सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्स 'चे जागीं हिंदुस्थान सरकारनें मि. जे. एच. टॉमस ह्या एका ब्रिटिश अॅक्चुअरीची नेमणूक पांच वर्षांच्या मुदतीनें केली आहे. ह्या अधिकाऱ्यानें विमा कायद्याची अंमलबजावणी करावयाची आहे.

### हिंदुस्थानांतील सोन्याचें उत्पादन

म्हैसूर येथील कोलार खाणींतून १९३७ सालीं ३,३०,६९० औंस सोन्याचें उत्पादन झालें. १९३६ चे मानानें हें उत्पादन १,००० औंसांनीं कमी आहे. कोलार खेरीज हिंदुस्थानांत इतर ठिकाणीं सोन्याचें विशेष उत्पादन होत नाहीं.

### हिंदी कोळशाचें उत्पादन

१९३७ सालीं हिंदी कोळशाच्या खाणींतून २ कोटि, २३ लक्ष टन कोळसा निघाला. हा आकडा १९३६ मधील उत्पादनापेक्षां १७½ लाखांनीं मोठा आहे.

### १२० फूट लांबीचे रूळ

आगगाडीच्या रूळाची लांबी प्रत्येकीं ६० फूट असते. १२० फूट लांबीचे रूळ बसविले असतां डब्यांत ऐकूं येणारा खटक, खटक हा आवाज कमी होईल, ह्या दृष्टीनें विलायतेंत प्रयोग चालू आहेत.

### गिरणीवाले व कारखानदार ह्यांची लंडनमध्यें दाटी

कामगारांस काम देणारे गिरणीवाले व कारखानदार लंडन शहरांत केंद्रीभूत झाले आहेत. सबंध ग्रेट ब्रिटनमधील एकूण मालकांपैकीं एकचतुर्थांश म्हणजे सुमारें १,५७,००० मालक लंडनमध्यें राहतात.

### ब्रिटिश कापडावरील जकात

सध्यां हिंदुस्थानांत आयात होणाऱ्या जपानी कापडावर शेकडा ५० टक्के दरानें जकात आकारण्यांत येते. ब्रिटिश कापडावरील जकातीचा दर मागें २५ टक्के होता, तो आतां उतरवून २० टक्के करण्यांत आला आहे. हिंदी सर्वसाधारण जकातीचा किमान दर १५ टक्के असतांना संरक्षक जकात म्हणून बसविण्यांत आलेली ब्रिटिश कापडावरील जकात ह्यापेक्षां कमी करण्यास विशेष वाव नाहीं. लँकेशायरला एवढी मोठी सवलत असूनहि ब्रिटिश शिष्टमंडळ आपल्या मागण्यास चिकटून बसलें आहे.

### लॉर्ड रे इंडस्ट्रिअल म्यूझिअम, पुणें

पुणें येथील लॉर्ड रे इंडस्ट्रिअल म्यूझिअम गेल्या वर्षी ३६३ दिवस उघडा होता व ह्या मुदतींत त्यास ७४,०१७ लोकांनीं भेट दिली. म्यूझिअमचें एकूण उत्पन्न ९,९०७ रुपये होऊन खर्च ७,९६१ रुपये झाला.

### मुंबई बंदरांतून आयात–निर्गत

१ एप्रिल, १९३७ ते ३१ मार्च, १९३८ ह्या मुदतींत ३१ लक्ष, ९० हजार टन वजनाचा माल मुंबई बंदरांत उतरला व २३ लक्ष, ४१ हजार टन वजनाचा माल बंदरांतून बाहेर गेला. १९३६-३७ मध्यें तत्सम आकडे अनुक्रमें २९ लक्ष, ८० हजार टन व २४ लक्ष ८० हजार टन असे होते.

### मुंबई बंदरांतून सोन्याची सामाहिक निर्गत

| | किंमत रुपये |
|---|---|
| १–५–३८ ते ७–५–३८ | १६,६५,२३३ |
| ८–५–३८ ते १४–५–३८ | २८,१३,१९७ |
| २१-९-३१ ते १४–५–३८ | ३,१४,०१,०६,३८१ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | २३२ |
| २ वैयक्तिक स्वार्थ व आर्थिक स्वातंत्र्य ह्यांस राष्ट्रीय पायबंद | २३३ |
| ३ चेक्सवरील स्टँप ड्यूटी | २३३ |
| ४ स्फुट विचार ... नवीन सरकारी कर्जे—हिंद-ब्रिटन व्यापारी कराराच्या वाटाघाटी—हिंदी कपाशीचा खप होण्याची आवश्यकता-सिंध प्रांताची अव्यावहारिक मागणी—कालवे व पाटबंधारे: मद्रास आणि मुंबई | २३४ |
| ५ नवीन नोकराची निवड कशी करावी ? | २३६ |
| ६ उद्योग दिन पाळा | २३७ |
| ७ अखिल भारतीय गोप्रदर्शन ... | २३८ |
| ८ सोलापूर जिल्ह्यांतील सहकारी चळवळ | २३९ |
| ९ हिंदी कपाशीचें उत्पादन व उठाव ... | २४० |
| १० मुंबई प्रांतांतील जंगल खातें | २४० |
| ११ मालांच्या किंमतींत वाढ | २४० |
| १२ निवडक बाजारभाव | २४१ |



# अर्थ

बुधवार, ता. १८ मे, १९३८


## वैयक्तिक स्वार्थ व आर्थिक स्वातंत्र्य ह्यांस राष्ट्रीय पायबंद

### नव्या आर्थिक मनूचा अवतार

व्यक्तींच्या स्वार्थसाधू मागणी-पुरवठ्याच्या प्रमाणांत देवींघेवीं होऊन बाजारभाव, व्याजाचे दर, मजुरी व नफा हीं निश्चित होतात, ह्या आद्य अर्थशास्त्रज्ञप्रणीत सिद्धांतास अलीकडे सर्वत्र हरताळ फासला जात आहे. रशियामध्यें समाजसत्तावादाचें आणि जर्मनी व इटली ह्या देशांत हुकूमशाहीचें प्राबल्य झाल्यानें केवळ तेथेंच अनियंत्रित स्वार्थप्रेरित देवघेवींच्या व्यवहारांचें नियमन एकछत्री अधिकारानें होत आहे असें नसून तोच प्रकार कमी-अधिक प्रमाणांत इतरत्रहि चालू झाला आहे. अमेरिकन राष्ट्र हें अमर्याद वैयक्तिक स्वार्थ व नफेबाजी ह्यांचें माहेरघर मानण्यांत येत असे, परंतु तेथेंहि राज्यकर्त्यांचा हात उद्योगधंदे व व्यापार ह्यांच्या व्यवस्थेंत चांगलाच शिरला असल्याचें दिसून येतें. गेल्या शतकाच्या पूर्वार्धांत वैयक्तिक स्वार्थ व स्पर्धा बोकाळून राज्यकर्ते आर्थिक व्यवहारांपासून अलिप्त रहाण्याची प्रथा प्रस्थापित होण्यापूर्वी जी परिस्थिति होती आणि जो प्रघात रूढ होता, त्यांचें पुनरुज्जीवन आतां झालें आहे. ह्या प्रघातास "मर्कंटाइलिझम" अशी संज्ञा आहे. त्यास अनुसरून बाजारभाव ठरवणें, व्यापाराला विशिष्ट प्रकारचें वळण लावणें आणि मागणी-पुरवठ्याच्या नियमांस धाब्यावर बसवून राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें इष्ट वाटेल तसें आर्थिक धोरण ठरवून अमलांत आणणें हें राज्यकारभाराचें मामुली कार्य समजण्यांत येत असे. अधिकांत अधिक उत्पादन व लौकिक सुख प्राप्त होण्याच्या मार्गांत ह्या राजकीय ढवळाढवळीनें व्यत्यय येतो ह्या मुद्यावर अर्थशास्त्रज्ञांनीं अशा नियंत्रणाचा निषेध करून विनिमय-स्वातंत्र्य अर्थोत्पादक आहे म्हणून त्याचा पुरस्कार केला. परंतु आतां राष्ट्रांच्या व्यावहारिक जीवनांत ह्या अर्थशास्त्रीय सिद्धांतास बगल देण्याची प्रवृत्ति राजकर्त्यांमध्यें स्पष्टपणानें दृष्टोत्पत्तीस येत असल्यानें नवीन आर्थिक मनू चालू झाला असल्याचा पुरावा पुढें येत आहे.

रशिया, जर्मनी, इटली, तुर्कस्तान इत्यादि राष्ट्रें घटकाभर बाजूस ठेवलीं तरी अमेरिकेसारख्या प्रबळ व संपन्न राष्ट्राचें उदाहरण ह्या बाबतींत अत्यंत महत्त्वाचें आहे. नवीन अर्थवादाच्या मनूचीं म्हणजे जुन्या आर्थिक युगाच्या पुनरागमनाचीं ठळक चिन्हें ह्या नात्यामें तीन-चार प्रमुख बाबींचा येथें उल्लेख केला असतां पुरें होईल. वैयक्तिक मागणी-पुरवठ्याच्या अनियंत्रित घासाघिशींत सहज ठरणारे बाजारभाव समाजांत प्रभावी होतात आणि होणें सार्वत्रिक हिताचें आहे हा सिद्धांत आतां ग्रंथांतच राहिला आहे आणि प्रत्यक्ष व्यवहारांत "योग्य" किंमती कृत्रिम रीतीनें निश्चित करण्याचें धोरण अमलांत येत आहे. आपोआप ठरणारे "नैसर्गिक" बाजारभाव राष्ट्रीय हिताचे आहेत काय ह्याची छाननी राज्यकर्ते करूं लागले आहेत आणि आपल्या समजुतीप्रमाणें ते निश्चित करीत आहेत. एखादी गोष्ट "चांगली" आहे का "वाईट" आहे, "योग्य" आहे का "अयोग्य" आहे ह्या संबंधांतला निर्णय देणें नीतिशास्त्राचें काम असून त्यास अर्थशास्त्रांत जागा नाहीं असें परंपरागत अर्थविदेचें मत आहे. बाजारभावांची योग्यायोग्यता व इष्टानिष्टता तुम्हीं कोण ठरवणार? असें जुने अर्थपंडित विचारतात. समाजाच्या रक्षण-पोषणासाठी त्याचा निश्चय आम्हीं करणार व तो अमलांत आणणार असें सध्याचे पाश्चात्य राज्यकर्ते सांगतात. शेतकऱ्यांच्या कपास व गहूं वगैरे पिकांस चांगले भाव येऊन त्यांच्या कमाईंत घट होऊं नये म्हणून अमेरिकन सरकारनें अनेक कायदे केले असून विविध योजना अमलांत आणल्या आहेत हें कशाचें द्योतक आहे? तें वर निर्दिष्ट केलेल्या नवीन विचारांचें स्पष्ट चिन्ह आहे. मागणी-पुरवठ्याचा नियम व उद्योगधंद्यांचा किफायतशीरपणा ह्यांचा विचार बाजूस सारून अमेरिकन सरकारानें मजुरीचे दर निश्चित केले आहेत. मुंबई इलाख्यांतल्या कापूस-गिरण्यांतले मजुरीचे दर ह्याच रीतीनें ठरवले जात आहेत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. व्याजाचे प्रचलित दर वाढूं न देण्याचे संबंधांत राज्यकर्ते अमेरिकेंत व इंग्लंडमध्येंहि कारवाया करीत आहेत, त्यांत वैयक्तिक स्वार्थ व स्वातंत्र्य हीं कोठें आहेत? शेतीच्या मालाच्या किंमती उतरूं देऊं नयेत, मजुरीचे दर खाली येऊं नयेत पण कारखान्यांतील कामाचे तास कमी व्हावे आणि व्याजाचे दर बेताचे असावे अशी तजवीज केली जावी ह्या गोष्टी अमेरिकेंत लोकांच्या संवयीच्या झाल्या आहेत. आर्थिक मन्वंतराचा हा जागतिक अवतार आहे ही गोष्ट सार्वत्रिक निदर्शनास येणें अगत्याचें आहे.

## चेक्सवरील स्टँप ड्यूटी

चेक्सवरील स्टँप ड्यूटीमुळें हिंदुस्थानांतील लोकांत बँकिंगचा प्रसार होण्यास आडकाठी येते असें मत करन्सी कमिशननें १९२६ सालीं आपल्या रिपोर्टांत स्पष्टपणें नमूद करून ही ड्यूटी दूर करण्याविषयीं शिफारस केली होती. त्याप्रमाणें, १९२७ सालीं चेक्सवरील ड्यूटी काढून टाकण्यांत आली. ही निघाल्यामुळें चेक्सच्या पद्धतीची लोकप्रियता वाढण्यास सहाय झालें, असें मध्यवर्ती बँकिंग कमिटीस आढळून आलें व त्याप्रमाणें तिनें आपल्या रिपोर्टांत १९३१ सालीं उल्लेखहि केला. बँकिंग चौकशी कमिटीवर १५ लक्ष रुपये खर्च करणाऱ्या मध्यवर्ती सरकारास

चेकसवरील ड्यूटीमुळें होणारें वार्षिक ७ लक्ष रुपयांचें नुकसान जाचक वाटूं लागलें व ड्यूटी परत बसविण्याचा मोह त्यास आवरला नाहीं. १९३३ सालीं सर जॉर्ज शूस्टर ह्यांनीं हें प्रतिगामी पाऊल टाकण्याचा यत्न केला; तथापि लोकमताचा विरोध प्रभावी ठरून त्यांस आपला बेत बदलावा लागला.

व्याजाचे दर ६ टक्क्यांचे आसपास असतांना हुंड्यांवर बसविण्यांत आलेली पट्टी, आजच्या ३ टक्के दराच्या व्याजाचे काळांत हुंड्यांस सहन होत नाहीं व हुंड्यांचे पतीवर रकमा काढण्याचें प्रमाणहि आतां कमी झालें आहे. हुंड्यांवरील स्टँप ड्यूटी कमी केल्यास त्यांची उलाढाल वाढेल, ह्या अपेक्षेनें रिझर्व्ह बँकेनें ड्यूटीमध्यें उतार करण्याविषयीं हिंदुस्थान सरकारास सुचविलें. सरकारनें हें म्हणणें मान्य करतांना, त्यामुळें होणारें नुकसान भरून काढण्याकरितां चेकसवर ड्यूटी बसविण्याचें ठरविलें आणि त्याप्रमाणें विधिमंडळांत बिल मांडण्यांत आलें. गेल्या १० वर्षांत चेकसची पद्धति लोकप्रिय झाली असून प्रस्तुत ड्यूटीमुळें चेकसचा उपयोग कमी करण्याकडे लोकांची प्रवृत्ति होईल, असा ह्या बिलास वाजवी आक्षेप आहे. चेकसवरील पट्टी काढून टाकली तरी त्यामुळें चेकसची देवघेव वाढलेली नाहीं, असें सरकारतर्फे सांगण्यांत येतें; परंतु तें क्लिअरिंग हौसेसमधून त्यासंबंधीं आकडे मिळवून सिद्ध करण्यांत आलें पाहिजे. आर्थिक मंदीमुळें पैशाची उलाढाल मंदावलेली असली, तरी चेकसची संख्या वाढलेली आढळेल असें माहितगार लोकांचें म्हणणें आहे. सर्वसाधारण अनुभवहि हेंच सांगतो. मध्यम वर्गांतील लोकांस बँकेंतील आपल्या पैशावर चेक काढून व्यवहार करण्याची सवय आतां लागलेली आहे आणि दुकानदारांचें तर चेकबुकावांचून मुळींच चालत नाहीं. सरकारी बिलानें सहकारी बँकांच्या चेक्सना पट्टीची माफी देऊन बिलास होणाऱ्या विरोधाची तीव्रता कमी करण्याचा यत्न केला आहे. परंतु ह्या सवलतीचा फायदा सर्व समाजास मिळणें आवश्यक आहे. सामान्य जनतेचा व्यापारी बँकांशीं संबंध जडून व्यावहारिक मनोवृत्ति व बँकिंगची सवय ह्यांचा विकास व्हावा ह्यासाठीं सरकारनें मध्यम वर्गांतील लोकांच्या चेक्सवरहि ड्यूटी लादतां कामा नये.

रिझर्व्ह बँक व तिचीं स्थानिक बोर्डें ह्यांनीं चेक्सवर ड्यूटी लादण्याच्या सरकारच्या धोरणास आपला विरोध दर्शविला आहे व सर्वसाधारण लोकमतहि ड्यूटीस प्रतिकूल आहे. चेक्सवरील ड्यूटीचें उत्पन्न प्रांतिक सरकारांतून वांटून देण्याचें आमिष त्यांच्या मंत्र्यांस दाखवून मध्यवर्ती सरकारच्या फडनवीसांनीं स्वतःची बाजू सजवण्याचा यत्न चालविला आहे. प्रांतांच्या वांट्यास येणाऱ्या क्षुद्र रकमांचे मानानें ड्यूटीमुळें होणारें अंतिम अनहित ज्यास्त ठरेल, हें उघड आहे. मध्यवर्ती असेंब्लींतील लोकप्रतिनिधी सरकारच्या कारवाईस बळी पडतां पडतां बचावले व स्टँपड्यूटी बिलाचा विचार पुढें ढकलण्यांत आला. तथापि, अद्याप हें बिल माघारी घेण्यांत आलेलें नाहीं. हुंड्यांवरील ड्यूटी कमी करतांना चेक्सवरील पट्टी वाढविण्याचें सरकारचें धोरण कोणासच पसंत नाहीं. तेव्हां चेक्सच्या ड्यूटीपासून जनतेचा बचाव होऊन बँकिंगच्या प्रसाराचे मार्गांत निष्कारण अडथळा येणार नाहीं, अशी व्यवस्था करण्यांत आली पाहिजे. मुंबईच्या इंडियन मर्चंट्स चेंबरनें हिंदुस्थान सरकारास ह्याबाबत एक विस्तृत पत्र लिहून आपला अभिप्राय कळवला आहे. पुण्याच्या मराठा चेंबरनें ह्या बिलाविरुद्ध मत प्रदर्शित करण्यांत पुढाकार घेतला होता, हें "अर्था"च्या वाचकांस विदित आहेच. हिंदुस्थान सरकार लोकमतास मान देऊन आपला हट्ट चालविणार नाहीं अशी आशा करण्यास आतां जागा आहे.

# स्फुट विचार

## नवीन सरकारी कर्ज

हिंदुस्थान सरकारनें पंचवीस वर्षें मुदतीचें पंधरा कोटि रुपयांचें कर्ज काढण्याची आपली योजना जाहीर केली आहे. कर्जावरील व्याजाचा दर ३ टक्के असून शंभर रुपये दर्शनी किंमतीच्या रोख्याची किंमत ९८ रुपये ठेवली आहे. परतफेडीस पात्र झालेल्या पूर्वींच्या कर्जाचे पैसे देऊन टाकण्यासाठींच मुख्यत्वें करून हें कर्ज आहे. सरकारी रोख्यांत पैसे गुंतवूं इच्छिणाऱ्या लोकांस पसंत पडतील अशाच प्रकारच्या शर्ती प्रस्तुत कर्जाचे बाबतींत योजलेल्या असल्यानें तें यशस्वी होईल ह्यांत संशय नाहीं. हिंदुस्थान सरकारास २¾ टक्क्यांचे ऐवजीं ३ टक्के दरानें व्याज देऊं करावें लागलें असून शेकडा २ रुपये कमी घ्यावे लागत आहेत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. त्यावरून पैशाच्या बाजाराची सद्य:परिस्थिती आणि त्याविषयींची अपेक्षा ह्यांची चांगली कल्पना येते. मुंबई प्रॉव्हिन्शिअल लँड मॉर्गेज बँकेच्या डिबेंचर्सवर व्याजाचा दर ३½ टक्के आहे आणि त्यांचे मुद्दल व व्याज ह्यांचे बद्दल प्रांतिक सरकारनें हमी घेतली आहे. त्याच वेळीं फ्रान्समधील सरकार राष्ट्रीय संरक्षणाच्या लढाऊ योजना पार पाडण्यासाठीं सुमारें चाळीस कोटि रुपये कर्ज काढीत आहे, त्या तीस वर्षें मुदतीच्या कर्जावर ५टक्के व्याज द्यावें लागत आहे. त्यांत फ्रेंच सरकार आणि राष्ट्र ह्यांची सांपत्तिक स्थिति काय आहे ह्याचें गमक सांपडतें. ब्रिटिश सरकारहि संरक्षणाचा लढाऊ खर्च भागवण्यासाठीं कर्ज काढीत आहे. परंतु त्यास तें बेताच्या व्याजाचे दरानें मिळत आहे. फ्रान्सच्या मानानें ग्रेटब्रिटनची सांपत्तिक स्थिति बरी आहे त्याचें हा फरक स्पष्ट लक्षण आहे. हिंदुस्थान सरकार कर्ज काढीत आहे, तें भांडवलाची टंचाई त्यांस भासत आहे म्हणून नव्हे. पूर्वकर्जाची फेड सोयीनें त्यांस करतां येत आहे. १९३८–४० सालांच्या मुदतीचें ५½ टक्क्यांचें आणि १९३९–४४ सालांच्या मुदतीचें ५ टक्क्यांचें अशी जुन्या कर्जांची परतफेड कमी व्याजाच्या दरानें काढलेल्या नवीन कर्जानें करण्यांत उघड फायदा आहे.

---

## हिंद–ब्रिटन व्यापारी कराराच्या वाटाघाटी

ग्रेट ब्रिटन व हिंदुस्थान ह्यांमधील नियोजित व्यापारी करारासंबंधींच्या वाटाघाटींस आतां पुनः प्रारंभ झाला आहे. मध्यवर्ती असेंब्लीनें ओटावा कराराची मुदत प्रदीर्घ करण्याचें नाकारल्यानंतर, नवीन करार दोन्हीं देशांस संमत होईपर्यंत ओटावा कराराप्रमाणेंच परस्पर व्यापार चालावा असें ठरलें. तथापि, ह्या नव्या कराराच्या वाटाघाटींची प्रगति अत्यंत मंद गतीनें चालली आहे. लँकेशायरचें शिष्टमंडळ आतां हिंदुस्थानांत दाखल झालेलें असून सिमला येथें ब्रिटिश व हिंदी व्यापारी प्रतिनिधींचा एकमेकांशीं विचार विनिमय चालू आहे. ब्रिटिश कापडाचा हिंदुस्थानांतील खप दिवसानुदिवस घटत चालला असल्याकारणानें, त्या देशास येथें विशेष सवलती पाहिजे आहेत. हिंदी गिरणीवाल्यांचा ह्यास अर्थातच विरोध आहे. हिंदी कपाशीस बाहेर देशांत वाढत्या प्रमाणावर मागणी येऊन तिच्या उठावास सहाय व्हावें, असा कपाशीच्या उत्पादकांचा आग्रह असणें सहाजीकच आहे. जपान आतां पूर्वीप्रमाणें कपाशीची उचल करीत नाहीं; तेव्हां ग्रेटब्रिटनशीं करावयाच्या व्यापारी करारांत हिंदी कपाशीच्या निर्गतीस

योग्य स्थान मिळावें, असें त्यांचें म्हणणें आहे. ह्या मागणीचा फायदा घेऊन व हिंदी कपाशीच्या ग्रेटब्रिटनमधील उठावास गैरवाजवी महत्त्व देऊन ब्रिटिश शिष्टमंडळास आपल्या स्वतःच्या मागणीस बळकटी आणतां येईल. वाटाघाटींतील महत्त्वाच्या प्रश्नांचा निर्णय प्रस्तुत भेटीमध्यें लागून कराराच्या मसुद्यापर्यंत प्रगति होईल, अशी अपेक्षा आहे.

### हिंदी कपाशीचा खप होण्याची आवश्यकता

१९३७-३८ च्या मोसमांतील हिंदी कपाशीचें उत्पादन त्या पूर्वीच्या हंगामांतील उत्पादनापेक्षां सुमारें ११ टक्क्यांनीं लहान असल्यानें, उतरलेल्या बाजारभावानें त्याची किंमत कमी होऊन शेतकऱ्यांच्या हलाखींत भर पडणार आहे. कपाशीखालील जमिनीचें क्षेत्रांत वाढ होऊनहि उत्पादनांत घट झाल्यानें ही परिस्थिति निर्माण होणार आहे. १९३६ सालीं जपाननें आपल्या एकूण आयात कपाशीपैकी ४४ टक्के इतकी कपास हिंदुस्थानांत खरेदी केली, ह्यावरून ह्या देशाच्या जपानवरील कपाशीबाबतच्या अवलंबनाची कल्पना येईल. जपाननें आतां आपली आयात आखडती घेतली आहे व त्यामुळें हिंदी कपाशीच्या खपाचें संकोचन झालें आहे. हिंदुस्थानांतील गिरण्यांत कपास कापड तयार करून तें परदेशांत खपविल्याखेरीज हिंदी कपाशीस गिऱ्हाइक मिळणार नाहीं. हिंदी कापडास इतर देशांत वाढती मागणी येत आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. आपल्या देशांतील गिरण्यांतच आपली कपास खपविण्याची आवश्यकता असतांना, ब्रिटिश व्यापारी शिष्टमंडळाच्या मागण्या मान्य करून हिंदुस्थानांत ब्रिटिश कापडास सवलती देणें हितकर होणार नाहीं. ग्रेटब्रिटनमध्यें अत्यंत मंद गतीनें हिंदी कपाशीचा उठाव होत आहे व त्यांत प्रगति होण्यास विशेष जागा नाहीं. त्याचप्रमाणें, भारी जकाती भरून हिंदुस्थानांत ज्या देशाचें कापड स्पर्धा करूं शकतें, त्याबरोबर देण्याघेण्याच्या वाटाघाटी करणें व त्या देशांत आपली कपास खपवणें, आणि ज्या देशास सवलत मिळूनहि आपला माल खपवतां येत नाहीं अशा देशास आणखी सवलत देणें ह्या दोन गोष्टींत महदंतर आहे. ग्रेटब्रिटन व हिंदुस्थान ह्यांच्या व्यापारी प्रतिनिधींच्या वाटाघाटींतून काय निष्पन्न होतें तें लवकरच दिसेल. त्यांच्या चर्चेंत वर निर्दिष्ट केलेल्या विचारांस महत्त्व प्राप्त होणें आवश्यक आणि अपरिहार्य आहे.

### सिंध प्रांताची अव्यावहारिक मागणी

सिंध प्रांत नव्या राज्यघटनेनें विभक्त केल्यानंतर, सक्कर येथील धरणाप्रीत्यर्थ उभारलेलें कर्जहि त्या प्रांताकडे वर्ग करण्यांत आलें. सिंध प्रांत आपल्या पायावर उभा राहील, अशी त्याची परिस्थिति नसतांहि तो स्वतंत्र स्थापन करण्यांत आला व हिंदुस्थान सरकारनें त्यास दरसाल मोठी रक्कम मदतीदाखल देण्याचें कबूल केलें. १९४६-४७ अखेर त्या प्रांतास सालिना १ कोटि, ५ लक्ष रुपये मदत मिळावयाची असून, त्यानंतर २० वर्षे दरसाल ८० लक्ष रुपये मिळावयाचे आहेत. नंतरचीं पांच वर्षे ६५ लक्ष रुपये व अखेरचीं पांच वर्षे ४५ लक्ष रुपये, अशी मदत त्या प्रांतास मिळत राहणार आहे. सर ओटो नीमायर ह्यांच्या शिफारसीनुसारच ही योजना आखण्यांत आली आहे व सक्कर धरणाच्या कर्जाचे परतफेडीचा विचार त्यांत करण्यांत आलेला आहे. २० कोटि रुपये कर्जावर ४½ टक्के दरानें व्याज आकारण्यांत येतें. सिंध प्रांतानें हिंदुस्थान सरकारास पहिलीं १५ वर्षे दरसाल ७५ लक्ष रुपये, नंतर १० वर्षे सालिना ६० लक्ष रुपये व पुढें प्रत्येक वर्षी ५० लक्ष रुपये मुद्दल परत करावयाचें आहे. सुमारें ४० वर्षांत कर्जाची परतफेड व्हावी, अशी ही योजना आहे. वास्तविक पहातां, ही कर्जफेड हिंदुस्थान सरकारच्या वार्षिक ग्रँटमधूनच होणार आहे; म्हणजे एका हातानें मदत म्हणून रकम देऊन दुसऱ्या हातानें तीच रकम कर्जाची फेड म्हणून परत घेण्याचा हा प्रकार आहे. सिंध प्रांताच्या कर्जाचा बोजा ह्या रीतीनें हिंदुस्थान सरकाराकडेच आलेला आहे. त्या प्रांतानें, आतां हें कर्ज 'लिहून' टाकावें, म्हणजे ह्यापुढें त्याची फेड करण्याचें कारण राहूं नये, असें सुचविलें आहे. ह्या प्रकारानें सिंध प्रांतास कर्जमुक्त केल्यास, हिंदुस्थान सरकारचे सालिना १ कोटि रुपये नुकसान होणार आहे. तें सोसण्यास मध्यवर्ती सरकार अर्थातच तयार नाहीं असें समजतें. सध्याच्या योजनेनुसार वस्तुतः हिंदुस्थान सरकारच आपलें येणें स्वतःच्या पैशांतूनच भागवीत असून, कर्जफेडीचा कागदी हिशेब केला जात आहे. सिंध मंत्रिमंडळाची योजना मान्य केल्यास नीमायर शिफारसीचा मूळ पायाच नष्ट होणार आहे, ही गोष्ट स्पष्ट आहे. कर्जाची रकम लिहून टाकावयाची असल्यास हिंदुस्थान सरकारची वार्षिक ग्रँटहि थांबली पाहिजे. सिंध प्रांताचें म्हणणें अव्यवहार्य असून तें हिंदुस्थान सरकारास अमान्य होणें स्वाभाविक आहे.

### कालवे व पाटबंधारे : मद्रास आणि मुंबई

मद्रास प्रांतांतील कालवे व पाटबंधारे ह्यांवर आजवर एकूण १५ कोटि, ३९ लक्ष रुपये भांडवली स्वरूपाचा खर्च झालेला आहे. १९३६-३७ सालीं त्यापासून १ कोटि, १९½ लक्ष रुपये निव्वळ उत्पन्न मिळालें; म्हणजे गुंतविलेल्या भांडवलावर ७·७ टक्के दरानें व्याज पडलें. आरंभापासून १९३६-३७ अखेर मिळालेल्या नफ्याची एकूण रकम ३० कोटि, ८० लक्ष रुपये भरते. मुंबई प्रांतांतील कालवे व पाटबंधारे हे मुख्यतः दुष्काळ निवारणासाठी केलेले असल्यानें त्यांवरील भांडवली खर्चावर इतकें समाधानकारक व्याज सुटत नाहीं. सरकारासच उलट कर्जावर व्याज द्यावें लागतें. ह्या प्रांतांत वरील प्रकारच्या ज्या कामांत एकूण १०¾ कोटि रुपये भांडवल गुंतलेलें आहे, त्यांपासून १९३६-३७ मध्यें ११ लक्ष रुपये निवळ उत्पन्न सरकारास मिळालें. मद्रास व मुंबई ह्या प्रांतांतील कालव्यांवरील खर्चाचे उत्पादकपणांत केवढें मोठें अंतर आहे, हें वरील आकड्यांवरून स्पष्ट होईल. मुंबई प्रांतांतील कालवे जरी रोख उत्पन्नाचे दृष्टीनें सरकारास फलदायी होत नसले, तरी त्यांचेमुळें दुष्काळी प्रांतांतील कित्येक शेतकऱ्यांचे जीवनास स्थैर्य आलें आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे. दुष्काळ पडल्यानंतर त्याची तीव्रता कमी करण्यापेक्षा, त्याचा संभवच दूर झाला तर उत्तम, ह्या दृष्टीनें कालव्यांचें महत्त्व ह्या प्रांतास विशेष आहे.

### एक नवीन धंदा


उपहार, चहापार्टी, इत्यादींचे समयीं अनेक लोक एकत्र येतात. त्यांचे फोटो घेऊन व त्या कांचा धुऊन छापील चित्रें मंडळी उठण्यापूर्वी त्यांस दाखविलीं असतां, फोटोंची विक्री तात्काळ होऊं शकते असा अनुभव एका ब्रिटिश फोटोग्राफरला आला आहे. दरसाल तो सुमारें ५० हजार फोटो ह्या तऱ्हेनें विकतो. वेगवेगळ्या ठिकाणीं जाऊन फोटो काढण्यासाठी त्यानें सात सहायक नेमले आहेत.

## नवीन नोकराची निवड कशी करावी ?

नवीन नोकर नेमावयाचे असतां उमेदवारांची निवड कशी करावी ह्यावर एका इंग्रजी लेखकाचे खालीं दिलेले विचार मननीय आहेत:—

नोकरांसाठीं जाहिरात प्रसिद्ध करावयाची असेल तर तिची मांडणी व्यवस्थित व स्पष्ट असावी आणि तिच्यावरून नेमणूक करणाऱ्या मंडळींचें नोकर वर्गाविषयींचें धोरण प्रतीत व्हावें. एका कंपनीच्या जाहिरातीवरून अनेक उमेदवारांचे अर्ज नुकतेच आले. त्यांचा उपयोग विशिष्ट जागा भरण्यांत तर झालाच; पण पुढें नेमाव्या लागणाऱ्या नोकरांच्या संबंधीं उपयुक्त माहितीहि त्या जाहिरातीमुळें कंपनीच्या दप्तरीं गोळा झाली. उमेदवारांशीं आढ्यतेनें किंवा तिरस्कारानें वागण्याची प्रथा चांगल्या कंपन्यांच्या व्यवस्थापकांत आढळत नाहीं. भेटीस उमेदवारांस बोलविलें असतां वक्तशीरपणानें भेट घेण्यांत येऊन त्यांस चांगल्या तऱ्हेनें वागवण्यांत येते. त्यांस जागा मिळण्याचें नशीब नसलें तरी आपणांशीं कंपनीच्या व्यवस्थापकांचें शिष्टपणाचें वर्तन होतें, ह्याबद्दल उमेदवारांस समाधान वाटतें. लायक नोकराची निवड होण्यांत सेवक आणि सेव्य ह्या दोघांचें हित आहे हें विसरतां कामा नये. सुव्यवस्थित मंडळ्यांकडे लायक उमेदवारांचा विशेष ओढा असण्याचा अधिक संभव असतो. उमेदवारास भेटीस बोलवावयाचें असल्यास लायकीविषयींचा लेखी पुरावा त्याचेजवळ असेल तो सर्व बरोबर आणण्यास सांगावें. औपचारिक स्वरूपाच्या प्रशस्तिपत्रकांचा फारसा व्यावहारिक उपयोग होत नाहीं. छापील नमुन्याच्या अर्जाची आवश्यकता उघड आहे; तथापि उमेदवारांस थोडक्यांत स्वतः-विषयींची माहिती अगोदर लिहून कळवण्यास सांगणें बरें. उमेदवारानें, विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें समक्ष भेटीमध्यें दिल्यावर वेतनाच्या विषयीं व कराव्या लागणाऱ्या कामासंबंधानें वगैरे प्रश्न विचारण्याची त्यास संधी द्यावी. पगार व बढती ह्यांवरच तो विशेष जोर देऊं लागल्यास त्याची पात्रता कमी समजली जाते. उत्कृष्ट दर्जाचे उमेदवार ह्या बाबतींत फारशी चौकशी करीत नाहींत, कारण अघळ पघळ अभिवचनें देणारा धंदेवाला विश्वासार्ह असत नाहीं. उमेदवारांची चौकशी दोन-तीन अधिकाऱ्यांनीं आपापल्यापरी स्वतंत्र रीतीनें केलेली बरी. कारण ह्या योगानें एका माणसाच्याच मनावर उमेदवाराचें भवितव्य अवलंबून रहात नाहीं. उमेदवार भांबावून जाऊं नये अशी व्यवस्था करण्यांत यावी. धंद्यास प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष उपयोगी पडेल असा कांहीं अनुभव उमेदवारास आहे कीं काय हें पहावें. सामान्य प्रकारच्या लायकीच्या जोडीनें ह्या ज्ञानाचेंहि महत्त्व कंपनीस आहे. वरच्या दर्जाच्या अधिकाऱ्यांची नोकर लोकांशीं वागणूक सहानुभूतीची असावी; ह्या कामीं निवळ हडेलहप्पी उपयोगी नाहीं. उदाहरणार्थ, अपेक्षेच्या मानानें एखाद्या नोकरास कमी बढती दिली गेल्यास ही गोष्ट चिठी लिहून कळवण्याऐवजीं त्याच्या वरिष्ठास तोंडी समजाऊन सांगितली जाणें अधिक श्रेयस्कर असतें.


नू. म. वि. हायस्कूल, पुणें
[ फक्त वरच्या दर्जांच्या विद्यार्थ्यांकरितां ]
पहिले इयत्तेंतील ३१५ जागांपैकीं आतां फक्त ५० जागा रिकाम्या आहेत. याशिवाय फक्त चौथे इयत्तेंत थोड्याशा जागा आहेत. पालकांनीं विद्यार्थ्यांस घेऊन शाळेंत सकाळीं ८ ते १० यावें.
१७।५।३८. } ना. ग. नारळकर, मुख्याध्यापक


टिळक आयर्न अँड स्टील वर्क्स
[ सर्व प्रकारचें स्टील स्ट्रक्चरल वर्क ( काम ) तयार करतात. ]
मो. मु. टिळक
प्रो. मेकॅनिकल इंजीनिअर.

ज्वालेची मधुरता तुम्हांला मोहून टाकील—!!
नटवर्य चंद्रमोहनचें मराठींतील काम !
मराठी 'ज्वाला' या हंस चित्रांत नटवर्य चंद्रमोहन यांनींच मुख्य भूमिका केली आहे ही सुवार्ता महाराष्ट्रीय रसिकांच्या आनंदांत खात्रीनें भर घालील !
— 'हंस' कृत —
ज्वाला
ज्वालेमधील संवाद
इतके काव्यमय, इतके गोड, इतके उद्बोधक, इतके भावना उद्दीपित करणारे आहेत कीं तुम्ही खास मोहित व्हाल.
ज्वालेमधील गाणीं
इतकीं गोड, इतकीं हृदयस्पर्शी इतकीं रसपरिपोषक आहेत कीं तीं ऐकून तुम्ही खास मोहित व्हाल.

## ता. १ जून रोजीं उद्योगदिन पाळा

### उद्योगधंद्यावद्दल आवड उत्पन्न करण्याची योजना

[ले.—ह. वि. कदम, डी. एम्. (लंडन), जी. टी. सी. ( बॉम्बे ) मुख्य व्यवस्थापक, झारापकर टेलरिंग कॉलेज, पुणें व दादर. ]

आपल्या देशांत जी आर्थिक मंदी पसरली आहे व तरुणांमध्यें बेकारीचा प्रादुर्भाव अत्यंत वाढत्या प्रमाणांत होत आहे, त्याच्या मुळाशीं तरुणांमधील उद्योगधंद्यावद्दलची अनास्था व उद्योगधंद्याकडे कमीपणानें पाहाण्याची दृष्टी हें एक प्रमुख कारण आहे. ही स्थिति सुधारणें व देशाची आर्थिक उन्नति होणें हें उद्योगधंद्यांच्या उत्कर्षावर अवलंबून आहे. ह्या गोष्टीकडे तरुणांचें लक्ष वेधावें ह्या हेतूनें उद्योगधंद्याच्या निरनिराळ्या क्षेत्रांत असलेल्या सर्व लोकांनीं वर्षांतून एक दिवस उद्योगदिन म्हणून साजरा केल्यास व त्या दिवशीं व्यापार व उद्योगधंदे यांचें महत्त्व तरुणांना पटवून दिल्यास या आतांपर्यंत दुर्लक्ष झालेल्या महत्वाच्या क्षेत्राकडे तरुणांचें लक्ष अधिक लागेल व त्यामुळें त्यांची आर्थिक स्थिती सुधारून देशाचा फायदा झाल्याशिवाय राहाणार नाहीं. या दृष्टीनें अनेक विद्वान व उद्योगधंद्यांतील तज्ज्ञ गृहस्थांशीं विचारविनिमय करून ता. १ जून हा दिवस उद्योग-दिन म्हणून साजरा करण्यांत यावा असें ठरवून गेल्या वर्षी हा दिन महाराष्ट्रांतील उद्योगधंद्याच्या क्षेत्रांतील प्रमुख अशा ५०-६० संस्थांमार्फत प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ प्रो. वा. गो. काळे एम. ए., संपादक अर्थ, ह्यांच्या अध्यक्षतेखालीं आमच्या सुप्रसिद्ध झारापकर टेलरिंग कॉलेजच्या सभागृहांत मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला होता. हा दिन साजरा करण्यांत 'केसरी मराठा' संस्था, व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिट्यूट, लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्यूझियम, कॉंग्रेस खादी भांडार, महाराष्ट्र प्रकाशन संस्था, ॲडल्ट एज्युकेशन लीग, महाराष्ट्र इंडस्ट्रियल एजन्सी, सेवासदन सोसायटी, स्कूल ऑफ कामर्स, मराठी सेंटर, झारापकर्स कॉलेज ऑफ फोटोग्राफी इत्यादि अनेक प्रमुख संस्थांनीं भाग घेतला होता. गतवर्षाप्रमाणेंच ह्या वर्षीहि अखिल महाराष्ट्रभर हा दिन साजरा करण्यांत येऊन उद्योगधंद्यांत मार्गे असलेल्या महाराष्ट्रीय तरुणांमध्यें उद्योगधंद्यावद्दल आवड उत्पन्न होईल असे कार्यक्रम ठेवावे. १ जूनच्या सुमारास आपल्या देशांतील हजारों तरुण आपला शिक्षण व्यवसाय संपवून आपल्या आयुष्याची दिशा ठरविण्याच्या विचारांत असतात. सृष्टिदेवी आपला बेकारीचा उन्हाळा संपवून देशांत धनधान्य उत्पन्न करण्यासाठीं मेघवृष्टी करण्याचा उद्योग सुरू करते. अशा वेळीं देशांतील तरुणांनीं उद्योगधंद्याच्या अनेक क्षेत्रांतून शिरकाव करून ह्या अभागी देशाचें भाग्य उज्ज्वल करण्याची प्रतिज्ञा करण्यास १ जून हाच दिवस अत्यंत योग्य असा आहे. ह्या वर्षी हा उद्योगदिन गेल्या वर्षापेक्षांहि अत्यंत मोठ्या प्रमाणांत अखिल महाराष्ट्रभर साजरा करण्यांत येईल अशी आम्हीं उमेद बाळगतों.

## झारापकर टेलरिंग कॉलेजचा स्तुत्य उपक्रम

### १० हरिजनांना मोफत शिक्षण

पुणें येथील झारापकर कॉलेजमध्यें दरवर्षी ५ हरिजन विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्यांत येतें. ह्या वर्षी सदर संस्थेमार्फत दादर येथें प्लाझा सिनेमा समोर नवीन टेलरिंग कॉलेज उघडलें असल्यामुळें पुणें येथील कॉलेजांत ५ व दादर येथील कॉलेजांत ५ असे १० हरिजन विद्यार्थी ह्या वर्षी संस्थेंत मोफत शिक्षणासाठीं घ्यावयाचे आहेत. तरी ज्या हरिजन विद्यार्थ्यांना ह्याचा फायदा घ्यावयाचा असेल त्यांनीं ज्या कॉलेजांत नांव दाखल करावयाचें असेल त्या कॉलेजच्या पत्त्यावर २० मे पर्यंत अर्ज करावे, असें संस्थेचे व्यवस्थापक कळवितात.


**बार्शी सेंट्रल को ऑपरेटिव्ह बँक लि.**

( स्थापना १९०६ )

| | |
|---|---|
| शेअरचे वसूल झालेलें भांडवल | ७९,५७० |
| रिझर्व्ह फंड | ४५,४०५ |

ह्या बँकेमध्यें सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारण्यांत येत असून, सध्यां अंमलांत असलेले व्याजाचे दर पुढें दिल्याप्रमाणें आहेत:—

| | | |
|---|---|---|
| ( १ ) चालू ठेवी | द. सा. द. शे. | १ |
| ( २ ) सेव्हिंग बँक ठेवी | " " " | २ |
| ( ३ ) कायम ठेव मुदत १ वर्ष | " " " " | २½ |
| " " " २ " | " " " " | ३ |
| " " " ३ " | " " " " | ३½ |
| " " " ५ " | " " " " | ४ |

अधिक माहितीकरितां समक्ष अथवा पत्रद्वारें चौकशी करावी.

बार्शी, ५-५-३८. — र. प पटवर्धन, मॅनेजर.



**CONFIDENCE**

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

NEW BUSINESS

Last year 1936-37

Exceeds

2 CRORES & 82 LAKHS

BONUS

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 | On Whole Life Rs. 20

**HINDUSTHAN**

Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches* : Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Office* : throughout India & the East.

S. C. MAJUMDAR,
MANAGER : Bombay Branch.

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## अखिल भारतीय गोप्रदर्शन, दिल्ली

### जळगांव गिलिगन फार्मचें अनुकरणीय कार्य

( लि. आ. म. )

तारीख १४ ते १९ फेब्रुवारी, १९३८ अखेर दिल्ली येथें अखिल भारतीय गोप्रदर्शन दरवर्षी भरत असलेल्या अश्व प्रदर्शनास जोडून भरविण्याची योजना केली होती. सदर प्रदर्शनांत हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रसिद्ध जातींचे ४५० गाई-बैल आले होते. विशेषत: पंजाब व सरहद्दप्रांत यांनीं त्यांत प्रामुख्यानें भाग घेतला होता. शिवाय धार, बडोदा, हैद्राबाद, म्हैसूर, कोल्हापूर, सांगली, जुनागड, भावनगर वगैरे संस्थानांतील महत्त्वाच्या जातींचीं जनावरें प्रदर्शनांत दिसत होतीं. ब्रिटिश प्रांतांतील गोसंस्थांना दिल्ली शहर फार दूर पडत असल्यामुळें खर्चाच्या दृष्टीनें त्यांना ह्या प्रदर्शनांत जनावरें पाठविणें जड गेलें असावें.

महाराष्ट्रांतील पुण्याचे डॉ. मराठे, धुळ्याचे श्री. कौजलगी, व जळगांव तालुका अग्रिकल्चरल असोसिएशनचे ओव्हरसियर श्री. साळुंखे एवढीच महाराष्ट्रीय मंडळी प्रदर्शनांत होती.

श्री. टी. टी. साळुंखे यांनीं शेतकी असोसिएशनच्या कार्यांत १८ वर्षें घालविलीं आहेत. त्यांनीं, तालुका शेतकी असोसिएशननें चालविलेल्या "गिलगिन कॅटल फार्म" तर्फे सदर दिल्ली प्रदर्शनांत सात नेमाडी जनावरें बरोबर नेऊन स्वत: प्रामुख्यानें भाग घेतला होता. नेलेल्या जनावरांस पुढीलप्रमाणें बक्षिसें मिळालीं आहेत:—

( १ ) सर्वप्रांतीय गाईंत नेमाड जातींत ह्या फार्मचे गाईस ५० रु. पहिलें बक्षीस मिळालें.

( २ ) सांडास ५० रुपयांचें दुसरें बक्षीस मिळालें.

( ३ ) कालवडीस २५ रुपयांचें दुसरें बक्षीस मिळालें.

( ४ ) सातहि जनावरांस प्रत्येकीं एक याप्रमाणें सात पदकें मिळालीं.

( ५ ) शिवाय लहान सांडास "हायली रकमेंडिंग सर्टिफिकेट" मिळालें.

आज हिंदी शेतकऱ्यांच्या हलाखीचीं जीं कारणें आहेत त्यांत जनावरांची अयोग्य निपज, त्यांच्या पैदाशीची अनास्था, जोड धंद्याकडे दुर्लक्ष, हीं कारणें बरीच महत्त्वाचीं आहेत. श्री. साळुंखे ह्यांनीं काढलेल्या पिंपळे कॅटल ब्रीडिंग फार्ममध्यें त्या गोष्टी शेतकऱ्यापुढें प्रत्यक्ष प्रयोगानें सिद्ध करून दाखविल्या जातात.

१—"नेमाडी" जातीच्या गाई व वळूं, २—जास्त दूध देणाऱ्या "जमनापारी" बकऱ्या ३—जास्त व मोठीं अंडीं देणाऱ्या "व्हाईटकेपान" कोंबड्या, इत्यादि प्रयोग शेतकऱ्यांच्या हितदृष्ट्या प्रत्यक्ष चालविले आहेत.

जळगांव तालुक्यांतील शेतकऱ्यास शेतीच्या मशागतीकरितां दरसाल २ लाख रुपयांचे व पूर्व खानदेशांतील शेतकऱ्यांस दरसल २५-३० लाख रुपयांचे बैल परप्रान्तांतून विकत आणावे लागतात. ही शोचनीय स्थिति लक्षांत घेऊन शेतकऱ्यांना उत्तम जातीचे नेमाडी वळूं ठेवून आपल्याच खेड्यांत ताकदवान जातीवंत बैल निपजवितां येतील. ही जाणीव शेतकऱ्यांना सप्रयोग करून देण्याचा हा स्तुत्य प्रयत्न आहे. या दृष्टीनें शेतकऱ्यांनीं प्रयत्न केल्यास आज नाहीं तरी १०-२० वर्षांत खानदेशी शेतकऱ्यांस खानदेशांतच जातीवंत बैल मिळतील व दरवर्षी खर्ची पडणाऱ्या मोठ्या रकमेची बचत होईल. ह्या रकमेचा विनियोग शेतकऱ्यास अनेक प्रकारें स्वोन्नतिकामीं करितां येईल.

( अपूर्ण )


# आपण विचार केला आहे का ?—

श्री. ग. स. मराठे, फेब्रुअरी ता. ११।३।३८ च्या 'केसरी'त लिहितात. "......सर्वसाधारण बाँड योजनांच्या विरुद्ध मीं तो लेख लिहिला असें नाहीं. बाँड योजना हा विम्याच्या अनेक प्रकारांपैकीं एक प्रकार आहे व प्रत्येक योजनेचा विचार जिच्या तिच्या गुणावरून केला पाहिजे..." सही ग. स. मराठे

## कल्पतरु बॉण्ड

इतका लोकप्रिय होण्याचें कारण—ती योजना बहुजनास पटली आहे. अजूनहि फक्त १३॥ रु. भरून 'कल्पतरु बाँड' घेतल्यास येत्या बक्षीस वांटणींत बक्षीस मिळण्याची संधि साधतां येईल. अधिक माहितीकरितां स्थानिक प्रतिनिधीस भेटा, किंवा खालील पत्त्यावर लिहा :

टी. आर. अभंग स्पे. ऑ. } महाराष्ट्र अिन्शुअरन्स कं.
सातारा सिटी } लि., कऱ्हाड (जि. सातारा)

ता. १५।५।३८ च्या आंत एजन्सी घेणारास
विशेष सवलती मिळतील.

प्रत्येक मोटार स्टँडवर बाँड विक्रीकरितां एजंटस् नेमायचे आहेत. त्यांचे अर्ज वरील मुदतींत स्पेशल ऑर्गनायझर, चीफ अगर स्पेशल एजंटस् अगर हेड ऑफिसकडे यावेत.

स्पेशल एजंटस्:—मे. केळकर ब्रदर्स, बुधवार चौक, पुणें.
" श्री. डी. आर. कुलकर्णी, ८८९ भांबुर्डा, पुणें ४.

चीफ एजंट:—श्री. आर. के. वाळवेकर, नगर.



# दि प्रॉव्हिन्शिअल बँक
## ऑफ अिण्डिया लिमिटेड
स्थापना १९३६

मुख्य कार्यालय : २२ / अ, हॉस्पिटल रोड, (सी. ॲण्ड. अेम्. स्टेशन ) बंगलूर

शाखा : मुम्बअी, काळबादेवी, दादर, पुणें, पुणें-शहर, नाशिक, पांचगणी, सातारा, कऱ्हाड, सोलापूर, सुरत.

अध्यक्ष : खानसाहेब हाजी अहमद कासम, अेम. अेल. सी.

मॅ. डिरेक्टर : अेस्. पी. ठाकर.

**करण्ट डिपॉझिट अकाउण्टस् :** १०० रु. किंवा त्याहून अधिक रकमांनीं चालू होतात आणि दैनिक शिलकेवर दरसाल दरशेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें.

**सेव्हिंग्ज डिपॉझिट अकाउण्टस् :** ५ रुपये आणि त्याहून अधिक रकमानिशीं चालू होतात आणि मासिक किमान शिलकेवर दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याज दिलें जातें. २०० रुपयापर्यंत कितीहि वेळा पैसे काढतां येतात. हा व्यवहार चेकनें करतां येतो.

**कायम मुदतीच्या ठेवी :** दीर्घकालीन आणि अल्पकालीन मुदतीच्या ठेवी सोयीस्कर अटीवर स्वीकारण्यांत येतात. ह्यासंबंधीची माहिती कार्यालयाकडून घ्यावी.

अनुमती मिळालेल्या कर्जंगेरूयावर हातउसन्या रकमा मिळतात.

सर्व प्रकारचें बँकिंगचें कामकाज केलें जातें.

अधिक माहिती मागवावी.

एम. मोहन, एजंट, १७ मेनस्ट्रीट पुणें.
एच. जी. गद्रे, एजंट, लक्ष्मीरोड, पुणें २

## सोलापूर जिल्ह्यांतील सहकारी चळवळ

तारीख ८-५-३८ रोजीं सोलापूर येथें सेंट्रल बँकेच्या इमारतींत सहकारी चळवळींत काम करणाऱ्या सद्गृहस्थांची परिषद् रा. ग. कृ. प्रधान, जी. डी. सी. ए., ऑडिटर को. सो., सोलापूर यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. परिषदेस सब ऑडिटर, जिल्ह्यांतील सर्व सहकारी बँकांचे म्यानेजर्स व इन्स्पेक्टर्स, सर्व सुपरवायझिंग यूनियनचे सुपरवायझर्स व प्रेसिडेंटस्, सोसायटयांचे चेअरमन व सेक्रेटरी वगैरे सहकारी कार्यक्षेत्रांत प्रत्यक्ष काम करणारे सद्गृहस्थ हजर होते.

या परिषदेंत सहकारी चळवळीच्या अनेक बाबींचा उहापोह करण्यांत आला. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे कर्जाच्या बाकया थकल्यामुळें सहकारी चळवळीस जो एक प्रकारचा बोजडपणा आला आहे व जी एक तऱ्हेची ग्लानी आल्यासारखी वाटत आहे ती घालविण्यासाठीं व ब्रह्मदेशांत यामुळें कोसळलेल्या गंडांतरासारखें गंडांतर या देशांतील सहकारी चळवळीवर कोसळूं नये यासाठीं कांहींतरी उपाय शोधून काढणें ही होती. याकरितां एक निश्चित योजना ठरविण्यांत आली. या योजनेप्रमाणें सोसायटीचा बाकीदार जसजसा जास्त वसूल देत जाईल तसतसें व्याजांत मिळणाऱ्या सवलतीचें प्रमाण वाढत जाईल. ज्या थकबाकीदाराकडे कर्जाची बाकी फार जुनी व त्याच्या परतफेडीच्या आंवाक्याबाहेरची असेल त्याला तीं फेडण्यास पांच वर्षे नवीन मुद्दत द्यावयाची असून अशा रीतीनें या साध्या कर्जाचें लांब मुदतीच्या कर्जांत रूपांतर व्हावयाचें आहे. १-७-३८ नंतर पुढें होणारें मागील रकमेवरील व्याज या लोकांना माफ करावयाचें असून येणारा सर्व वसूल मुद्दलांत जमा करावयाचा आहे व सर्व मुद्दल वसूल झालेनंतर ३०-६-३८ पर्यंतचे सांचलेलें व्याज अशाच लहान हप्त्यांनीं वसूल करावयाचें आहे. या लोकांचा धंदा चालू राहावा व त्यांस आपल्या मागच्या चुका दुरुस्त करण्यास अवसर मिळावा म्हणून जरा आखडत्या हातानें त्यांना नवीन लहान सहान कर्जेंहि देण्यांत यावयाचीं आहेत. ही योजना लोकांना नीट रीतीनें समजावून सांगण्यासाठीं सोलापूर जिल्ह्यांत २३ केंद्रें ठरविण्यांत आलीं आहेत. या योजनेमुळें सध्या दिसत असलेला सहकारी चळवळींतील निर्जीवपणा नाहींसा होईल अशी अपेक्षा आहे.

---

### मुंबई प्रांतिक लँड मॉर्गेज बँकेचीं डिबेंचर्स

मुंबई प्रांतिक सहकारी लँड मॉर्गेज बँकेनें २० लक्ष रुपयांचीं ३¼ टक्के दराचीं डिबेंचर्स काढलीं आहेत. प्राप्तीवरील कर डिबेंचर धारण करणारानें भरवावयाचा आहे. २५ वर्षांनंतर डिबेंचरची रकम परत केली जाईल. मात्र २० वर्षांनंतर पैसे परत देण्यास बँकेस अधिकार ठेवलेला आहे. मुंबई सरकारनें डिबेंचर्सचें मुद्दल व व्याज ह्यासंबंधीं हमी घेतली असल्यानें, तीं ट्रस्टी सिक्युरिटीजच्या सदरांत येतात.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

अधिकृत भांडवल १०,००,०००  विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००

खपलेलें भांडवल २,३२,०००  वसूल झालेलें भांडवल १,१५,७८०

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढतां येतात. या बँकेवरील चेक मुंबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. मार्फत कमिशनशिवाय वसूल केले जातात. बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

M. V. GOKHALE,
मॅनेजर.

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.

THE HOUSE OF MODERN STYLE SUITS.

# THE DECCAN TAILORING FIRM, DECCAN GYMKHANA, POONA 4.

# TAILORS & CLOTH MERCHANTS

—A FRESH STOCK OF NEW DESIGNS—

WOOLEN, COTTEN AND SILK SUITINGS, SHIRTINGS AND TROUSER FLANELS.

LONDON TRAINED CUTTER.

*MANAGER*—M. N. PATASKAR,
*F. C. D. (London).*

## हिंदी कपाशीचें उत्पादन व त्याचा उठाव

### इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीची पहाणी

हिंदी कपाशीचें उत्पादन व त्याचा उठाव ह्यासंबंधीं तपशीलवार पहाणी करण्याचें इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीनें योजिलें आहे. ह्या योजनेस पहिल्या वर्षी २ लक्ष, ३० हजार रुपये खर्च येईल, असा अजमास आहे. कपास हें हिंदुस्थानांतील प्रमुख व्यापारी पीक आहे व त्याची वार्षिक किंमत ६० कोटि रुपयांवर जाते, ह्या दृष्टीनें कॉटन कमिटीच्या पहाणीस विशेष महत्त्व आहे. मुंबई, लाहोर व दिल्ली येथें पहाणीकरितां केंद्रें स्थापण्याचा कमिटीचा विचार आहे. कपाशीच्या सुताचें उत्पादनहि चौकशीच्या कार्यक्षेत्रांत येईल.

### मुंबई प्रांतांतील जंगल खात्याचा अहवाल

मुंबई प्रांतांतील १२,९९८ चौरस मैल म्हणजे एकूण क्षेत्रफळाच्या १७ टक्के इतकी जमीन जंगल ह्या सदरांत मोडते. ह्यापैकीं ९,८९१ चौरस मैलांत खरोखर जंगल असून, २,९२९ चौरस मैलांत गवताखेरीज ज्यास्त कांहीं उगवत नाहीं. प्रांतांतील औद्योगिक, शेतीविषयक व इतर गरजा भागविण्यास सध्याचें जंगल अत्यंत अपुरें आहे, ह्या करितां झाडांचें जतन करून नवीन लागवड करीत रहाणें अत्यंत आवश्यक आहे. मुंबई सरकारच्या जंगल खात्यास १९३६-३७ सालीं एकूण ४७ लक्ष, ७२ हजार रुपये उत्पन्न मिळालें, त्यांतून सर्व खर्च वजा जातां १९ लक्ष, ६१ हजार रुपये निवळ उत्पन्न राहिलें. अहवालाचे वर्षी जंगल खात्यानें ५४ हजार रुपये खर्चून ६५ हजार एकरांत झाडांची लागवड वाढविण्याचा उपक्रम केला. जंगलांतील जमीन गरीब लोकांस विनामूल्य करावयास देण्याचें धोरण ह्या खात्यानें स्वीकारलें आहे.

### भागांच्या किंमतींत बेसुमार अनेपाक्षत चढउतार

मंदी-चलतीचे परिणाम निरनिराळ्या धंद्यांवर निरनिराळ्या रीतीनें होतात; आणि त्या धंद्यांचा व्याप ज्या मानानें मोठा, त्या मानानें त्यांचा नफा-तोटाहि मोठा असतो. वाईट दिवस येऊन सारखा तोटा होऊं लागला असतां कंपन्या आपलें भांडवलच फटकाऱ्यासरशी कमी करून टाकतात, म्हणजे उरलेल्या रकमेवर नफा दाखवतां येतो. ह्याच्या उलट, ज्यांस चांगला नफा उरतो, त्या कंपन्यांच्या भागांची बाजारांतली किंमत भरमसाट वाढते. केबल अँड वायरलेस ह्या ब्रिटिश कंपनीनें आपल्या साठ कोटि रुपयांच्या भांडवलापैकीं सुमारें २९ कोटि रुपये इतकें भांडवल हिशेबांतून काढून टाकलें. म्हणजे, भागीदारांनीं एकूण एवढी आपली रक्कम गमावली. त्याच्या उलट, दुसऱ्या एका कंपनीच्या भागांची किंमत गेल्या सहा वर्षांत सुमारें एक कोटि रुपयांची चवदा कोटि रुपये झाली आहे. तिसऱ्या एका कंपनीच्या भागांची एकूण किंमत १९३१ सालीं २६ लक्ष रुपये होती, ती सात वर्षांत ४½ कोटी रुपयांचे वर गेली !

### रत्नागिरी आंब्यांची विक्री

रत्नागिरी जिल्ह्यांत एकूण ४ हजार एकर आंब्यांची झाडें असून, दरसाल त्यांत वाढ होत आहे. प्रत्येक वर्षी सुमारें १० लक्ष रुपयांचे आंबे बाहेर जातात. गिऱ्हाइकांस दर शेकडा २५ ते ४० रुपये किंमत पडली तर त्यापैकीं ६ ते ८ रुपये आंबे पाठविणारांच्या पदरीं पडतात. माल बाजारांत पाठवून त्याच्या विक्रीची व्यवस्था करण्याकडे उत्पादकांनीं अधिक लक्ष दिल्यास त्यांस नफा ज्यास्त उरेल.





अखिल हिंदुस्थानांत पहिल्या
प्रतीचें अत्यंत लोकप्रिय
झारापकर टेलरिंग
कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें १
[ माहितीपत्रक मागवा ]

"घरच्या घरीं संगीत कलेंत प्राविण्य मिळविण्यास"
सर्वोत्कृष्ट-सचित्र-सुबोध-माहितीपूर्ण
संगीत-मार्गदर्शक
मालेचीं पुस्तकें.
गायन किं. ६ आ. | हार्मोनियम किं. २॥ रु. | दिलरुबा किं. १ रु. २ आ. | फिडल् किं. १ रु. ४ आ.
व्ही. पी. नें चार आणे जास्त पडतील.
प्रभा संगीत विद्यालय, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणें ४.

स्वल्प व्याजानें कर्ज
ता. २७ जून १९३८ रोजीं पहिल्या कर्ज वांटणीस कंपनीच्या नियमानुसार सुरवात होणार असून पूर्ण पैसे भरून सर्टिफिकेट घेणारांचेच नंबर कर्ज वांटणीच्या यादींत समाविष्ट होतील तरी ज्यांनीं पूर्ण पैसे भरले नसतील त्यांनीं ते तावडतोब भरावेत व स्वल्प म्हणजे ६॥% व्याजानें रु. १०० ते ५००० (सर्टिफिकेटचें सपांप्रमाणें) कर्ज घेऊं इच्छिणारांनीं अवघे रु. २४ भरून, सर्टिफिकेट्स घेण्याची त्वरा करावी. तारखेकडे लक्ष ठेवा. गांवोगांवीं एजन्ट्स पाहिजेत. प्रॉस्पेक्टस व एजन्सीसाठीं ८= चीं तिकीटें पाठवा. अगर समक्ष भेटा.
दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.
हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई.
ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं. २.

दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.
[ स्थापना सन १९३५ ]
९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर
कामाची वेळः—
दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १
चालू ठेवी द. सा. द. शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.
सेव्हिंग्ज बँक ठेवींवर द. सा. द. शें. ३ टक्के व्याज दिलें जातें.
मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.
कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.
मॅनेजिंग एजंटस्.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११८—० |
| ५% ( १९३९–४४ ) लोन ... ... ... | १०४—० |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८—५ |
| ३½% चिनमुदत ... ... ... ... | ९८—६ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०६—२ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | १००—६ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) ... | ११०—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... .. | ११३—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२५—८ |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% ... ... | १४०—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११२–१२ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ३१—२ |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५६०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ५% ... ... | ५८—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | ११८—४ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०२—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९६—४ |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९४६—४ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७१८–१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १२३–१२ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २२२—८ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | ११९—४ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३७०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १४४५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | १४७—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४०—० |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | १८—६ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ३८—२ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ७५ रु. बोनस ... | ४३००—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २१०—० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १७०—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. ... ... | २२७—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै ... | ९५६—४ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ३५–१५–३ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ४९—८ |


स्वतःचें मुलांना योग्य तऱ्हेनें शिक्षण देऊन त्यांचे आयुष्यांतील पुढील मार्गाची योग्य रीतीनें कालक्रमणा करण्याची तरतूद करून ठेवणें हें प्रत्येक विचारवंत मातापितरांचें आद्य कर्तव्य होय. वरील प्रकारची सोय, उत्तम रीतीनें, फक्त " आयुर्विम्या "चे योगेंच साधतां येते.

**कॉमनवेल्थ विमा कंपनी लिमिटेड, पुणें.**

ह्या सर्वश्रेष्ठ विमा संस्थेनें मुलांच्या शिक्षणाचे सोयीकरतां नवीन तऱ्हेचीं विद्यार्जनाचीं कोष्टकें सुरू केलीं आहेत.

ह्या बाबतींतील विशेष माहितीकरतां खालील पत्त्यावर लिहा.

रा. न. अभ्यंकर
बी. ए. एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.

**स्त्रियांचा आजार**

म्हणजे मुख्यतः विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध **आर्डोमिक्स** ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या **आर्डोमिक्स**मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. गुणांमध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत. किंमत, बाटलीस रु. ३. ट. ख. १२ आणे निराळा. एकदम तीन बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह ९ रु.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठी मुख्य विक्रेते:—

**धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डिपार्टमेंट नं. ६ )**

२५३/३ माधव विलास टिळकवाडी पुणें २.

**K. K. & Co.**
Photographic Dealers
POONA.

अप-टु-डेट शिलाई करतां

**महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा**

बुधवार चौक, पुणें — १२ तासांत कपडे शिवून मिळतील. — [ खादी भांडाराचे माडीवर

पुणें

**गेस्ट हाउस**

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशां साठी भोजनाचें व उतर-ण्याचें निर्धास्त ठिकाण.

टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड–गणपति चौक–पुणें.

हवेशीर जागा — सुग्रास भोजन — उत्तम आदरातिथ्य

अप–टु–डेट — पुण्यांत पहिलें उच्च दर्जाचें — अप–टु–डेट

**हेअर कटिंग सलून**

येथें आधुनिक इलेक्ट्रिक मशीनच्या सहायानें केस कापले जातात. इलेक्ट्रिक हेअर ब्रश व मसाज ह्यांची व्यवस्था. स्वच्छता व टापटीप हें आमचें वैशिष्ट्य. तज्ञ माणसाकडून विजेच्या सहायानें काम सुबक व स्वच्छ होतें.

पत्ताः—प्रो. डी. एम. आढाव, पी. डी. ब्रदर्स बिल्डिंग, टांगा स्टँड शेजारी, डेक्कन जिमखाना.

**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

**पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,**

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.

एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६१५ सदाशिव पेठ.




पुणें एजंटः—ठाकूर देसाई आणि कं., बुधवार, पेठ, पुणें
अनुभविक पदवीधर वैद्याकडून मोफत तपासण्याची व्यवस्था.
सकाळीं ८ ते ९. सायंकाळीं ४॥ ते ५॥.

SAHYADRI INS. Co
NASIK
BEST TO CHOOSE & TO REPRESENT
WANTED WORKERS OF EITHER SEX.
Particulars by post or in person.

**भारतीय अर्थशास्त्र**

लेखकः–प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ५५०; किंमत पांच रुपये

प्रथमतः अर्थशास्त्राच्या सामान्य तत्त्वांचें विवेचन करून पुढें हिंदुस्थानाच्या सांपत्तिक व औद्योगिक परिस्थितीचा ह्या ग्रंथांत विस्तरशः विचार केलेला आहे. हिन्दी संस्कृति, राष्ट्रीय अर्थशास्त्र, शेतकीचा धंदा, मजुरांची चळवळ, हुंडणावळ, सहकारी चळवळ, संरक्षक धोरण, करपद्धति वगैरे सर्व महत्त्वाच्या प्रश्नांचें सांगोपांग विवेचन केलेलें वाचकांस आढळेल.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें